# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्र.रानिआ/मनपा २०१५/सं.क्र.२७९/का.०५
नवीन प्रशासन भवन , हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२.
दिनांक - ०९.०४.२०१५

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी

विषय : रिट पिटीशन क्र.४१७१ व ४२४३/२०१४
श्री.विजय पाटील व शितल पाटील विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर
निवडणूक कालावधीत शस्त्र परवानाधारकाकडून शस्त्रे जमा
करण्यासंबंधात मार्गदर्शक सूचना

संदर्भ : महाराष्ट्र शासन, गृह विभाग यांची क्र. एसयुटी २०१४/सी-६२/
पोल-९, दि.२०.०९.२०१४ व दि.३०.०३.२०१५ ची पत्रे

महोदय,

उपरोक्त संदर्भाधीन पत्रे कृपया पहावीत. दिनांक २०.९.२०१४ च्या पत्रान्वये निवडणूक कालावधीत शस्त्र परवानाधारकाकडून शस्त्रे जमा करण्यासंबंधात मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. त्यामध्ये शस्त्र जमा करण्याबाबत छानना समिती गठीत करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच दि.३०.०३.२०१५ च्या पत्रान्वये स्थानिक संस्थांच्या निवडणूकांसाठी छानना समितीवर राज्य निवडणूक आयोगाचा प्रतिनिधी म्हणून जिल्हापरिषद/पंचायत समिती, नगरपालिका/नगरपंचायती आणि ग्रामपंचायतीच्या निवडणूकांकरीता संबंधित जिल्हयाचे उपजिल्हाधिकारी (सामान्य) यांची नियुक्ती करण्यात यावी व सदरचे पद रिक्त असल्यास त्या जिल्हयाचे निवासी उप जिल्हाधिकारी हे प्रतिनिधी म्हणून काम पाहतील. तसेच महानगरपालिका निवडणूकांचे संदर्भात संबंधित महानगरपालिका आयुक्त यांना राज्य निवडणूक आयोगाचा प्रतिनिधी म्हणून नियुक्त करण्यात यावे अशा सूचना दिल्या आहेत. त्याअनुषंगाने संदर्भाधीन पत्रे आवश्यक कार्यवाहीसाठी आपल्याकडे पाठविण्यात येत आहेत.

आपला,

(ध. मा. कानेड)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**महाराष्ट्र शासन**

**तात्काळ**

क्रमांक : एसयुटी-२०१४/सी- ६२/पोल-९
गृह विभाग, सेंटर-१, जागतिक व्यापार केंद्र,
३० वा मजला, मुंबई ४०० ००५.
दिनांक :- २० सप्टेंबर,२०१४

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त,
सर्व जिल्हादंडाधिकारी,
सर्व पोलीस अधीक्षक.

विषय :- रिट पिटीशन क्र.४१७१ व ४२४३/२०१४
श्री. विजय पाटील व शितल पाटील विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर

निवडणूक कालावधीत शस्त्र परवानाधारकाकडून शस्त्रे जमा करण्यासंबंधात मार्गदर्शक सूचना.

संदर्भ :- १) केंद्रीय निवडणूक आयोगाचे दि.१३/३/१९९६ चे आदेश.
२) क्र.एसयुटी-०७०९/सी- ६३/पोल-९, दि. १७ ऑगस्ट,२००९ चे आदेश.

मा. उच्च न्यायालयाने दि.१०.७.२००९ रोजी दिलेल्या आदेशान्वये निवडणूक कालावधीत शस्त्र परवानाधारकाकडून शस्त्र जमा करण्याबाबत संदर्भाधीन पत्र क्र.२ प्रमाणे मार्गदर्शक सूचना (Guidelines) विहित केलेल्या आहेत. सदर मार्गदर्शक सूचना अधिक्रमित करुन पुढीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना (Guidelines) विहित करण्यात येत आहेत.

**मार्गदर्शक सूचना (Guidelines)**

अ) प्रत्येक जिल्हयात तसेच आयुक्तालयाच्या क्षेत्रात एक छाननी समिती असेल. जिल्हास्तरावर या छाननी समितीमध्ये जिल्हादंडाधिकारी व पोलीस अधिक्षक यांचा समावेश असेल. आयुक्तालयाच्या ठिकाणी या समितीमध्ये पोलीस आयुक्त व सह पोलीस आयुक्त / अपर पोलीस आयुक्त (प्रशासन) यांचा समावेश असेल.

a) There shall be a Screening Committee in every District and in every Commissionerate area. In the District the Screening Committee shall consist of

the District Magistrate and the Superintendent of Police. In the Commissionerate area it shall consist of the Commissioner of Police and Joint /Additional Commissioner of Police (Admn.)

ब) निवडणूक आयोगाने निवडणूकीची तारीख जाहीर केल्यापासून छाननी समिती छाननीच्या कामाला सुरुवात करेल.

b) The Screening Committee shall commence the work of screening from the day of declaration of dates of election by the Election Commission.

क) मुक्त व निष्पक्ष वातावरणात निवडणुका पार पाडण्यासाठी निवडणुका जाहीर झाल्यानंतर छाननी समिती (राज्यातील प्रचलित कायद्यानुसार) सर्व शस्त्र परवाना धारकांचा व्यक्तीनिहाय्य व तपशिलवार आढावा तात्काळ घेऊन कोणत्या शस्त्र परवाना धारकांची शस्त्रे जप्त करणे आवश्यक आहे हे सुनिश्चित करतील आणि आपला अहवाल परवाना प्राधिकरणास सादर करील. छाननी समितीची शिफारस परवाना प्राधिकाऱ्यांना बंधनकारक असेल.

c) For ensuring free and fair elections, immediately after the announcement of elections, the Screening Committee shall make an individual and detailed review (in accordance with the prevalent state law) of all licence holders and state law) of all licence holders and decide the cases in which they consider it essential to impound the licenced arms. The report to this effect shall be sent to the Licensing Authority.

ड) सर्व शस्त्र परवाना धारकांचा आढावा घेताना खालीलप्रमाणे वर्गीकरण करता येईल :

d) At the time of review all licence holders can be classified as follows :

१) जामिनावर मुक्त झालेल्या व्यक्ती

i) Persons released on bail.

२) गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्ती आणि

ii) Persons having a history of criminal offences; and

३) कोणत्याही वेळी पण खासकरुन निवडणूक कालावधीमध्ये दंगलीत समावेश असलेल्या व्यक्ती.

iii) Persons involved in rioting at any time but especially during the election period.

(वरील वर्गीकरण हे केवळ उदाहरण म्हणून दिलेले असून ते परिपूर्ण वर्गीकरण नाही हे छाननी समितीने ध्यानात ठेवावे.)

(The Screening Committee shall bear in mind that the above categories are only illustrative and not exhaustive.)

इ) छाननी समितीचे कामकाज जबाबदारीने व पारदर्शकरित्या पार पाडावे या करिता खालीलप्रमाणे कार्यपध्दती अवलंबण्यात यावी.

e) For responsible and transparent functioning of Screening Committee

१) छाननी समितीच्या बैठकीच्या वेळी उपस्थित असलेल्या सदस्यांची नावे नोंदविण्यात यावीत.

i) The Screening Committee shall record the names of members present on the day of Screening Committee meeting.

२) छाननी समितीने त्यांच्या बैठकीत किती वैयक्तिक प्रकरणे हाताळली याबाबतची माहिती बैठकीच्या दिवशी छाननी केलेल्या शस्त्र परवाना धारकाच्या नावासह ठेवावी.

ii) The Screening Committee shall keep proper data of their meeting, which should reflect the number of individual cases dealt with in a meeting of Screening Committee including the names of licence holders scrutinized on a particular day.

३) प्रत्येक वैयक्तिक शस्त्र परवाना धारकाचा पोलीसांकडील अभिलेख छाननीच्या वेळी लक्षात घेण्यात यावा.

iii) The police record of every individual licence holder shall be taken into account at the time of scrutiny.

४) निवडणूक आयोगाने या संदर्भात वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

iv) The directions issued by Election Commission from time to time in this regard shall be strictly adhered to.

५) छाननी समितीने त्यांच्या समोर सादर झालेल्या प्रकरणांचा आढावा घेतल्यानंतर निर्णयाप्रत येण्याकरिता विचारात घेतलेली कारणे व निष्कर्ष व्यक्तीनिहाय व स्वतंत्रपणे नमूद करावीत.

v) The Screening Committee shall record the independent and individual reasons for arriving at their decision and conclusion thereof.

६) छाननी समितीने त्यांच्या अहवाला सोबत या मार्गदर्शक सूचनांन्वये विहीत करण्यात आलेले सहपत्र-अ जोडावे.

vi) A certificate prescribed as Annexure-A shall be attached to the report of Screening Committee.

७) छाननी समितीने त्यांच्यासमोर ठेवलेल्या परवान्यांच्या बाबतीत शक्यतो नामनिर्देशन पत्रे भरण्याच्या पहिल्या दिवसापूर्वीच सदरहू छाननी प्रक्रिया पूर्ण करावी.

vii) The Screening Committee shall complete the exercise of screening in respect of licences placed before it as far as possible before the 1st day of filing of nominations.

फ) छाननी समितीने त्यांच्या अहवालासोबत सहपत्र-अ मध्ये प्रमाणपत्र सादर केलेले नसल्यास परवाना प्राधिकरणाने सदर अहवालावर कार्यवाही करु नये. छाननी समितीचे कामकाज जबाबदारीने पार पाडले जात आहे याची खात्री करुन घेण्याच्या दृष्टीने सदर प्रमाणपत्र छाननी समितीने सादर करण्यावर भर देण्यात यावा. जेणेकरुन मा.उच्च न्यायालय व निवडणुक आयोगाने या संदर्भात दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पूर्णपणे पालन झाल्याचीदेखील खात्री करुन घेता येईल.

f) The Licensing Authority shall not act upon the report of Screening Committee unless it is accompanied with the Annexure-A. It should insist Screening Committee to submit the said certificate in order to ensure the responsive approach of Screening Committee which in turn

will ensure the strict compliance of directions issued by Hon'ble High Court and Election Commission in this regard.

ग) छाननी समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर या अहवालाप्रमाणे ज्या-ज्या शस्त्र परवानाधारकाची शस्त्र जमा करावयाची आहेत त्या-त्या प्रत्येक शस्त्र परवानाधारकास शस्त्र जमा करण्याच्या सूचना उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवसापुर्वी शस्त्र परवाना प्राधिकरणाने द्याव्यात. तसेच परवाना धारकास याचीही जाणिव करुन देण्यात यावी की, शस्त्र परवाना जमा करण्यात कोणत्याही प्रकारची कुचराई झाली तर भा.दं.वि.कलम १८८ खंड (एच) नुसार खटला दाखल करण्यात येईल.

g) On receipt of report from the Screening Committee, the licensing authority shall issue notice before the last date fixed for withdrawal of candidature to the individual licence holder for depositing his arms and inform the licence holder that failure to deposit the arms as directed would result in prosection under Section १८८ of the I.P.C.as stated in clause (h).

ह) परवाना धारकांनी तशा आशयाची सूचना प्राप्त झाल्यानंतर ताबडतोब व कोणत्याही परिस्थितीत ७ दिवसांच्या आत शस्त्रे जमा करावीत. परवाना धारकांना यासंबंधात योग्य ती पोचपावती देण्यात यावी.

h) The licence holder thereafter shall deposit his arms forthwith and in any case within a period of seven days from the date of receipt of the notice. The licensing Authority shall give proper receipt to the licence holder.

ई) एखादया परवाना धारकाने विहित मुदतीत शस्त्र जमा न केल्यास त्याच्यावर भा.दं.वि. कलम १८८ नुसार खटला भरावा.

i) Any licence holder who fails to deposit arms within the period specified above shall be liable for prosecution under section १८८ of Indian Penal Code.

ज) प्रशासनाकडे जमा केलेली सर्व शस्त्रे निवडणूकीचा निकाल लागल्यानंतर एका आठवडयाच्या आत परत करावीत.

j) All the arms so deposited with the administration be returned to the licence holder within a period of one week after declaration of election results.

ख) वरील कालमर्यादा शक्यतो पाळावी.

k) The above time-frame should be adhered to as far as possible.

२. निवडणूक कालावधीत शस्त्र परवानाधारकाकडून त्यांची शस्त्रे जमा करतांना मा.उच्च न्यायालयाने विहीत केलेल्या वरील मार्गदर्शक सूचनांची व केंद्रीय निवडणूक आयोगाने दिलेल्या दि.१३/०३/१९९६ च्या आदेशाचे काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

सोबत : केंद्रीय निवडणूक आयोगाचे
दि.१३/३/१९९६ चे आदेश.

(वि.अ.दाईंगडे )
कक्ष अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

## **Annexure-A**

This is to certify that the Screening Committee has followed the guidelines issued by Government Circular No.SUT-2014/C-62/Pol-9 dt. September, 2014 while submitting the enclosed report dt.................. to the Licensing Authority

Signature of
Screening Committee members

## **सहपत्र-अ**

छाननी समितीने शासन परिपत्रक क्र.एसयुटी-२०१४/सी-६२/पोल-९ दिनांक सप्टेंबर,२०१४ मध्ये विहित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करुन सोबतचा दिनांक .........................चा अहवाल परवाना प्राधिकरणास सादर केला आहे असे प्रमाणित करण्यात येत आहे.

छाननी समिती सदस्याची स्वाक्षरी

## ELECTION COMMISSION OF INDIA

Nirvachan Sadan, Ashoka Road,
New Delhi 110 001.
Dated the 13th March 1996.

No. 464/96-L & O/PLN-1/3534

*Subject.*—General Election/Bye-elections
restrictions on possession of arms during elections.

### ORDER

In exercise of the powers conferred on the Commission under Article 324 of the Constituion of India and all other powers enabling it in this behalf and in supersession of all other instructions, the Commission hereby orders that the following instructions shall be observed during all future elections.

1. Issue of licence for arms will be totally prohibited during the period commencing with the date of announcement of elections. This ban will continue to be operative till the completion of the election is notified.

2. The police should be directed, to be vigilant and asked to start mopping up operations of the areas infested with known goonda and other bad elements right from the date of announcement of elections. During such mopping up operations special attention should be paid to unearth and seize unlicensed arms and ammunition. A very thorough search and seizure by the State Police of unlicensed arms and places of indigenous manufacture of arms and ammunition shall be carried out and persons involved shall be arrested. While unearthing and seizure of unlicensed weapons is a normal ongoing responsibility of the police, it shall be vigorously intensified during the election period. Inter-State and intra-State movements of trucks and commercial vehicles shall be strictly checked with a view to preventing smuggling of arms and ammunition and anti-social elements. Raids should be carried out regularly and intensively on underground arms factories.

3. Immediately after the announcement of elections, District Magistrates shall make a detailed and individual review and assessment (in accordance with the prevalent State laws) of all licence holders so that licensed arms in those cases where they consider it essential are impounded in order to ensure maintenance of law and order an essential for ensuring free and fair elections. These arms should be deposited with the district authorities. Among cases which may need to be reviewed are the following :—

(*a*) persons reeased on bail,

(*b*) persons having a history of criminal offences, and

(*c*) persons previously involved in rioting at ny time but especially during the election perod. (The above categories are only illustrative and not exhaustive).

4. After such review all such licence-holders who are identified shall be directed to deposit their arms with the District Administration during the period of one week from the last date for withdrawal of candidatures.

5. The District Administration shall make foolproof arrangements for keeping the deposited fire arms in safe custody. Proper receipt must be given to the licence holders deposting the fire arms. It shall be the bounden duty of the District Administration to ensure that all fire arms deposited with the Administration are returned to the licence holders immediately after one week after the declaration of results.

6. Prohibitory orders under secton 144 of the Criminal Procedure Code, 1973 shall be issued banning the carrying of licensed arms as soon as an election is announced and should be effective till the declaration of results.

7. This ban shall, not be applicable to those communities who are entitled to display weapons by long standing law, custom and usage. This shall however, not prevent the District Administration

to impound weapons of any such persons of even such communities if they are found to be indulging in violence or posing a threat to the maintenance of law and order and peaceful conduct of elections. In these cases also the fire arms shall remain impounded till one week after the declaration of results.

8. Strict vigil shall be maintained by thorough checking of lorries, light vehicles and all other vehicles from three days before the date of poll to ensure that no undesirable elements or arms and ammunition are being transported into the constituency from outside and to apprehend them if they are doing so. Such checking of vehicles shall continue till the completon of the counting of votes and the declaration of results. As and when such culprits are apprehended, the arms and ammunition and vehicles concerned shall be confiscated.

9. A copy of this order in English/Hindi and in the local offical language(s) shall be made available to the local units of all recognised National/State political parties, in each district immediately and to each candidate or the agent authorised by him at the time of his nomination (repeat nominations and not scrutiny of nominations) under acknowledgement.

10. The receipt of this order shall be acknowledged immediately.

By order and in the name of the Election Commission of India,

Sd/-

(K. P. G. KUTTY),
Secretary.

To

(1) The Chief Secretaries of all States and Union Territories.

(2) The Chief Electoral Officers of all States and Union Territories

STANDARD DISTRIBUTIONS

Weapons.

४२९—७७

IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY

CIVIL APPELLATE JURISDICTION

WRIT PETITION NO.4171 OF 2014

1.Vijay Dinkarrao Patil & Anr. ...Petitioners.
vs.
1.The State of Maharashtra & Ors. ...Respondents.

AND
WRIT PETITION NO.4243 OF 2014

Sheetal Ajit Patil. ...Petitioner
Vs.
1.The State of Maharashtra & Ors. ...Respondents.

----

Mr.V.P.Sawant i/b. Mr.Vinod Yashwantrao Jadhav, for the Petitioners in WP no.4171/14.

Mr.Nikhil Chavan, for the Petitioner in WP 4243 of 2014.

Mr.A.B.Vagyani, Government Pleader for Respondent nos.1 to 7.

-----

**CORAM : A.S.OKA &**
**G.S.KULKARNI, JJ.**

**DATED : 10th OCTOBER, 2014.**

----

**P.C. :**

In terms of the judgment and order dated 13th August,2014, fresh guidelines have been issued to the State Government on 20th September,2014. The suggestion of the learned Counsel for the petitioners in Writ Petition no.4171 of 2014 is that in case of the election of Local Authorities, a representative of the State Election Commission should be a member of the Screening Committee and in case of elections of the Parliament or Vidhansabha, a representative of Chief Electoral Officer of the State should be

Bombay High Court

::: Downloaded on - 25/11/2014 16:13:00 :::

nominated as a member of the Screening Committee. His submission is that this exercise of screening is required to be done essentially for ensuring free and fair elections. We are of the view that this suggestion is worth considering and the State Government shall consider this suggestion and take appropriate decision.

2. The second suggestion made by the learned Counsel is that the only selected cases should be placed before the Screening Committee. The learned Government Pleader states that normally the cases are placed before the Screening Committee alongwith the reports of the local police stations recording antecedents of the licence holders. The emphasis of the Election Commission appears to be on the consideration of cases of all the licence holders who are holding weapons. The State Government may consider of modifying the guidelines for providing that while placing the cases of all licence holders before Screening Committee, a latest police report of local police station on antecedents of each licence holder shall be placed before the Screening Committee to facilitate the Secreening Committee to take appropriate decision.

3. Another suggestion made by the learned Counsel is that in case of those licence holders where the Screening Committee finds that a case is made out for surrender of weapon, the Screening Commitee should issue notice to them and give them an opportunity of being heard. We find that this suggestion may not be practicable in the sense that the time gap between the

::: Downloaded on - 25/11/2014 16:13:00 :::

declaration of election programme and the date of voting can be only of three to four weeks and Screening Committee is required to examine large number of cases. However, the State Government may consider of giving discretion to the Screening Committee to issue notices to licence holders provided there is sufficient time available to the Screening Committee to give hearing to the affected licence holders.

5. Our attention is invited to Clause 5 of the guidelines. It is obvious that clause 5 contemplates that separate brief reasons for arriving at the decision and conclusion are required to be recorded by the Screening Committee in case of each licence holder. It is obvious that the decision of the Screening Committee will be by majority.

6. The learned Counsel pointed out that there are cases where the arms were found to have been damaged when the same were returned to the licence holders. In our view, it is necessary to provide in the guidelines that the Authority to whom the arms are surrendered shall make appropriate arrangements for proper storage of surrendered arms and shall ensure that there is no damage caused to the arms which are surrendered.

7. The State Government shall take appropriate decision for amending the guidelines in the light of what we have discussed above.

8. No further directions are required to be issued.

**(G.S.KULKARNI, J.)** **(A.S.OKA, J.)**

::: Downloaded on - 25/11/2014 16:13:00 :::

Bombay High Court

५७३/ ना-९
६/४/२०१५

महाराष्ट्र शासन

तात्काळ

राज्य निवडणूक आयोग
क्र. २२७६
दि. ६ एप्रिल, १५
कार्या. ९

क्रमांक : एसयुटी-२०१४/सी-६२/पोल-९
गृह विभाग, २ रा मजला, मुख्य इमारत,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ३० मार्च,२०१५

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त,
सर्व जिल्हादंडाधिकारी,
सर्व पोलीस अधीक्षक.

विषय :- रिट पिटीशन क्र.४१७१ व ४२४३/२०१४
श्री. विजय पाटील व शितल पाटील विरुध्द
<u>महाराष्ट्र शासन व इतर</u>
निवडणूक कालावधीत शस्त्र परवानाधारकाकडून
शस्त्रे जमा करण्यासंबंधात मार्गदर्शक सूचना.

संदर्भ :- समक्रमांकित दि.२०/०९/२०१४ च्या मार्गदर्शक सूचना.

संदर्भाधिन दि.२०/०९/२०१४ च्या पत्रान्वये निवडणूक कालावधीमध्ये शस्त्र परवाना धारकाकडून शस्त्र जमा करण्याबाबतच्या मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. सदर मार्गदर्शक सुचनांमध्ये आता पुढील मार्गदर्शक सुचनांचाही समावेश करण्यात येत आहे.

१) दिनांक २०/०९/२०१४ च्या मार्गदर्शक सुचनांमध्ये शस्त्र जमा करण्याबाबत छाननी समिती गठीत करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. आता यामध्ये स्थानिक संस्थांच्या निवडणूकांसाठी छाननी समितीवर लोकसभा/ विधानसभा निवडणूका वेळी राज्य मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांचा प्रतिनिधी म्हणून उप जिल्हा निवडणूक अधिकारी यांची नियुक्ती करावी. तर राज्य निवडणूक आयोगाचा प्रतिनिधी म्हणून जिल्हा परिषद/ पंचायत समिती, नगरपालिका/ नगर पंचायती आणि ग्रामपंचायतीच्या निवडणूकांकरीता संबंधीत जिल्हयाचे उप जिल्हाधिकारी (सामान्य) यांची नियुक्ती करण्यात यावी. सदरचे पद रिक्त असल्याने त्या जिल्हयाचे निवासी उप जिल्हाधिकारी हे प्रतिनिधी म्हणून काम पाहतील. तसेच महानगरपालिका निवडणूकांचे संदर्भात संबंधित महानगरपालिका आयुक्त यांना राज्य निवडणूक आयोगाचा प्रतिनिधी म्हणून नियुक्त करण्यात यावे.

२) राज्य शासनाने मार्गदर्शक सुचनांमध्ये सुधारणा करुन छाननी समितीसमोर प्रकरण सादर करताना अशा प्रत्येक शस्त्र परवाना धारकांच्या चारित्र्य पडताळणीचा अलीकडचा अहवाल ठेवावा. जेणेकरुन छाननी समितीस योग्य निर्णय घेणे सोईचे होईल.

३) ज्या परवानाधारकाचे शस्त्र जमा करावयाचे आहे त्यांचे शस्त्रे जमा करुन ठेवण्याची योग्य ती व्यवस्था करावी. तसेच शस्त्रांना जमा कालावधीमध्ये कोणतेही नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी. शस्त्रे जमा करताना ज्या स्थितीत होती त्या स्थितीतच धारकास जमा कालावधीनंतर परत केली जातील याची दक्षता घ्यावी.

(वि.अ.दाईंगडे)
कक्ष अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) मा. सचिव, राज्य निवडणूक आयोग

२) मा. राज्य मुख्य निवडणूक अधिकारी